-: प्रेसनोट दिनांक - २१/०८/२०२५ :-

आरोपी लोकसेवक १) अल्ताफ हारून सय्यद, पो.हे.कॉ.ब.नं. ८७१, तत्कालीन नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय इचलकरंजी विभाग इचलकरंजी रा. स्मशानभुमी समोर, शहापुर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, २) पवनकुमार अशोक उपाध्ये, खाजगी वकील, रा. दिपश्रेय, महालक्ष्मी व्हिलेज, साळुंखे मळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूरयांनी लाच मागणी केलेबाबत....

---

यातील तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक केलेबाबतचा तक्रारी अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी, इचलकरंजी यांचे कार्यालयामध्ये दिला होता. सदर अर्जाची चौकशी पोलीस कर्मचारी सय्यद हे करीत होते. अर्ज चौकशीमध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांना सय्यद यांनी बोलावुन घेवुन त्यांचेत मध्यस्थी केली.तेथे पोलीस सय्यद व तक्रारदार यांचे ओळखीचे वकील पवन उपाध्ये होते. वकील उपाध्ये यांनी पोलीस सय्यद साहेब सांगतात त्याप्रमाणे त्यांना पैसे दया म्हणजे ते तुमचे काम करतील तसेच तुमचे कामाकरीता, मी ही पाठपुरावा करतो असे म्हणाले होते. पोलीस सय्यद यांनी तक्रारदार यांना वकील पवन कुमार उपाध्ये यांचे अकाउंटवर ४०,०००/- रूपये पाठविणेस सांगितले होते. त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजस्तव त्यांचे गुगल पे वरून वकील उपाध्ये यांना ४०,०००/- रूपये पाठविले. त्यानंतर वकील उपाध्ये यांनी सदरचे ४०,०००/- रूपये अल्ताफ सय्यद यांना दिले. त्यानंतर तक्रारदार हे अल्ताफ सय्यद यांना भेटले त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना गैरअर्जदार यांनी चेक दिले असुन, सदरचे चेक सय्यद कडे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी चेक देण्याची विनंती केली. परंतु सय्यद यांनी ठरलेली रक्कम दिल्या शिवाय चेक देणार नाही असे म्हणून लाचेची मागणी करून सदरची रक्कम वकील उपाध्ये यांचेकडे देणेस सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती.

अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणी मध्ये तक्रारदार यांनी दिले तक्रारी अर्जाची चौकशी पोलीस कर्मचारी सय्यद हे करीत असल्याचे तसेच त्यांनी तक्रारी अर्जातील गैरअर्जदार यांचेकडून तक्रारदारयांना देणेसाठी चेक घेतले असल्याचे व ते चेक पोलीस सय्यद यांनी स्वत:कडे ठेवून घेतल्याचे तसेच पोलीस सय्यद यांनी तक्रारदार यांना उपाध्ये साहेबांशी बोललो आहे, असे सांगून तक्रारदार यांना वकील उपाध्ये यांचेशी बोलण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी उपाध्ये वकील यांना फोन केला असता, वकील उपाध्ये यांनी पोलीस सय्यद यांचेकडून तक्रारदार यांना चेक घेवून देतो, त्याकरीता पोलीस सय्यद यांचेकरीता तीन लाख रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे तीन लाख रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच वकील उपाध्ये यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या लाच मागणीस पोलीस सय्यद यांनी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

सदरबाबत आरोपी १) अल्ताफ हारून सय्यद, पो.हे.कॉ.ब.नं. ८७१, तत्कालीन नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय इचलकरंजी विभाग इचलकरंजी रा. स्मशानभुमी समोर, शहापुर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, २) पवनकुमार अशोक उपाध्ये, खाजगी वकील, रा. दिपश्रेय, महालक्ष्मी व्हिलेज, साळुंखे मळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द इचलकरंजी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे,यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, प्रकाश भंडारे, सहायक पोलीस उप निरीक्षक,विकास माने, पो.हे.कॉ., संदिप काशीद, पो.हे.कॉ., सचिन पाटील, पो.ना., उदय पाटील, पो.कॉ.प्रशांत दावणे, चा.पो.कॉ अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :-
०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९४०४३२१०६४, ९७६४१४०७७७.

४) कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

५) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४

६) व्हॉटस अप कमांक :- .९४०४३२१०६४.